## प्रेसनोट

दिनांक २२/११/२०२२

**“ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभागाने ०३ पिडीत महिलांकडुन जबरदस्तीने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या दलालांवरती कारवाई केलेबाबत. ”**

मा. पोलीस आयुक्त श्री. अकुंश शिंदे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये वेश्या व्यवसाय करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने अनैतिक मानवी वाहतुक विभागाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वेश्याव्यवसाय करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक २१/११/२०२२ रोजी हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीत स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या महिलांकडुन वेश्याव्यवसाय करुन घेणा-या तसेच जास्त पैशाचे अमिष दाखवुन वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणा-या दलालांवर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक २१/११/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक विभागातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीत स्नेहल व तिचा पती रॉकी असे नाव सांगुन मोबाईल वरुन कॉल व व्हॉट्सअॅप कॉल करुन महिलांचे फोटो पाठवुन वेगवेगळया हॉटेल व लॉजेसवर महिलांना स्वतः घेवुन जावुन त्यातील एका महिलेची निवड करण्यास सांगुन वेश्याव्यवसाय करवुन घेतात अशी माहिती मिळाली होती.

अशा मिळालेल्या माहितीवरुन हिंजवडी हद्दीत बनावट ग्राहक पाचारण करुन हॉटेल मध्ये रुम बुक करुन सापळा रचला असता यातील महिला आरोपी स्नेहल हि तिचे सोबत ०३ महिला हॉटेलमध्ये घेवुन आली व बनावट कस्टमर यास निवड करण्यास सांगितली असता त्यावेळी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभागातील पोलीस अधिकारी ,पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांनी हॉटेलमध्ये छापा टाकुन महिला आरोपी स्नेहल हिस ताब्यात घेवुन ०३ पिडित महिलांची वेश्याव्यवसायातुन सुटका केली आहे. सदर पिडीत महिला हया महाराष्ट्रातील आहेत. महिला आरोपी स्नेहल हिचे ताब्यातुन व घटनास्थळावरुन जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे.

१) ४,०००/- रु रोख रक्कम.
२) ६०/- रु किं चे इतर साहित्य.
३) १२,०००/- रु.कि.चा एक मोबाईल फोन जु.वा.कि.अं.

---

असा एकुण १६,०६०/- रु कि.चा.मुद्देमाल मिळुन आला म्हणुन महिला आरोपी १) स्नेहल राजेंद्र भोसले उर्फ स्नेहल ऋषिकेश कदम वय २८ वर्षे रा. ८८३ वडारवाडी हनुमान कॉर्नर,मॉडेल कॉलनी,फर्ग्युसन पुणे मुळ रा.सातारा व पाहिजे आरोपी २) रॉकी ऊर्फ ऋषिकेश शिरीष कदम वय ३० वर्षे रा. ८८३ वडारवाडी हनुमान कॉर्नर, मॉडेल कॉलनी,फर्ग्युसन पुणे यांचेविरुध्द हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुरनं १११८/२०२२ भादवि कलम ३७० (३), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास हिंजवडी पोलीस स्टेशन करीत आहे. **तसेच सदर आरोपींवर यापुर्वी हिंजवडी पोलीस स्टेशन येथे गुंरन ४६४/२०२२ भादवि कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.**

कारवाई दरम्यान केलेल्या चौकशी अंती असे उघडकीस आले की, एका महिलेची वेश्यागमनासाठी निवड करण्यास सांगुन ग्राहकांकडुन एका वेळेचे ३,०००/- रुपये ते ४,०००/- रुपये घेवुन पिडित महिलांना १२००/- रु व एका रात्रीचे १२,०००/- रुपये घेवुन फक्त ३,०००/- रुपये महिलांना देवुन त्यांचेकडून जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करुन घेत होते.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.अकुंश शिंदे सो, मा.अपर पोलीस आयुक्त श्री डॉ. संजय शिंदे साो, मा.पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), स्वप्ना गोरे मॅडम, मा.सहा. पोलीस आयुक्त,(गुन्हे) श्री. डॉ. प्रशांत अमृतकर, साो, यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षातील पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण,पोउपनि धैर्यशिल सोळंके,पोउपनि विजय कांबळे, पोलीस अंमलदार कल्याण महानोर, सुनिल शिरसाट, सुधा टोके, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे, संगिता जाधव, रेश्मा झावरे यांनी केली.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उपायुक्त, (गुन्हे)
पिंपरी चिंचवड